महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ३१ वे दिनांक : २२/०१/२०२६ वार : गुरूवार

## शिवसेना ठाकरे गटाच्या सरिता म्हस्के 'नॉट रिचेबल'



**मुंबई :** महापालिका निवडणुकांचे निकाल लागले असून आता महापौर पदाच्या निवडीवरून रस्सीखेच सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यातच विजयी नगरसेवकांची पळवापळवी देखील करण्याचे प्रकार सुरू झाल्याचे बोलले जात आहे. मुंबईसह उपनगरातील महापालिकांमध्ये नगरसेवकांना फोडण्याचा प्रयत्न होत असून शिवसेना ठाकरे गटाचे ४-५ नगरसेवक फुटल्याची चर्चा आहे. त्यात मुंबई वॉर्ड क्रमांक १५७ मधील ठाकरे गटाच्या नगरसेविका सरिता म्हस्के नोट रिचेबल आहेत. यावर आता आमदार अनिल परब यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

सरिता म्हस्के या नोट रिचेबल असल्याने एकच खळबळ उडाली होती. आता यावर अनिल परब यांनी भूमिका मांडली आहे. ते म्हणाले, नगरसेविका सरिता म्हस्के आमच्या संपर्कात आहेत, त्या कुठेही गेलेल्या नाहीत. त्यांनी त्यांचे कौटुंबिक कारण सांगितले आहे. पुढील एक महिन्यापर्यंत कोकण विभागीय आयुक्तांकडे नोंदणी करण्यासाठी कायदेशीर वेळ आहे. त्यामुळे सरिता म्हस्के यांची नोंदणी होईल. म्हस्के यांनी दिलेले कारण आम्ही कोकण विभागीय आयुक्तांना सांगितले आहे, अशी माहिती परब यांनी दिली. तसेच पुढील एक महिन्यात त्या न आल्यास काय कारवाई करायची याबाबत पक्षश्रेष्ठी ठरवतील, पण अशी वेळ येणार नसल्याचेही परब यांनी स्पष्ट केले आहे.

मुंबईच्या महापौरबाबत प्रश्न विचारला असता अनिल परब म्हणाले, देवाच्या मनात काय आहे हे उद्या सकाळी ११ वाजता कळेल, असे उत्तर त्यांनी दिले आहे. त्यामुळे मुंबईच्या महापौर संदर्भात आणखी सस्पेन्स वाढला आहे. तसेच महापौर पदाचे आरक्षण जाहीर होऊ द्या, उमेदवार ठरू द्या, मग पाहू काय करायचे, असेही परब यांनी यावेळी म्हटले आहे. तसेच कल्याणमध्ये मनसेने घेतलेल्या भूमिकेवर अनिल परब यांनी बोलणे टाळले आहे. मनसेने घेतलेल्या भूमिकेवर आम्ही बोलणार नाही. तो त्यांचा स्वतंत्र पक्ष आहे, असे परब यांनी म्हटले.

दरम्यान, मुंबईत ठाकरे गटाचे ६५ नगरसेवक निवडून आले असून महापौरपदासाठी शिंदे गट आणि भाजपमध्ये रस्सीखेच सुरू असतानाच, नगरसेवकांच्या फोडाफोडीच्या राजकारणाला वेग आला आहे. ठाकरे गटाने बोलावलेल्या नगरसेवकांच्या महत्त्वाच्या बैठकीला आणि गट नोंदणीसाठी नवी मुंबईला रवाना झालेल्या पथकातून नगरसेविका सरिता म्हस्के या गैरहजर राहिल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. म्हस्के या शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या शक्यतेने खळबळ उडाली असून, त्यांच्या या गूढ अनुपस्थितीमुळे ठाकरे गटात चिंतेचे वातावरण तर शिंदे गटाच्या पुढील हालचालींबाबतचा सस्पेन्स अधिकच वाढला आहे.

## सुनावणी झाली असती तर धक्का बसला असता - सुषमा अंधारे



**मुंबई :** शिवसेनेच्या सत्तासंघर्षाची सुप्रीम कोर्टातील आजची सुनावणी पुन्हा लांबणीवर टाकण्यात आली. ही सुनावणी परवा म्हणजे शुक्रवारी २३ जानेवारी रोजी होणार असल्याची माहिती आहे. पण विधिज्ञ असीम सरोदे यांनी ही सुनावणी शुक्रवारी होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा दावा केला आहे. आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी देखील ट्विट करत म्हटले की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने आमच्या अपेक्षेप्रमाणे तारीख पुढे ढकलल्याबद्दल जाहीर आभार! असे म्हणत उपरोधक टीका केली आहे.

सुषमा अंधारे यांनी मंगळवारी देखील या प्रकरणी ट्विट करत म्हटले होते की, ३७ नंबरचे मॅटर कधी बोर्डावरच येणार नाही. आपण भाबडा आशावाद सोडूया आणि ताकदीने लढूया, असे ट्विट त्यांनी केले होते. तसेच आज पुन्हा ट्विट करत त्यांनी या प्रकरणी म्हटले की, आज सुनावणी झाली असती तर मात्र धक्का बसला असता.

विधिज्ञ असीम सरोदे यांनी देखील ट्विट करत म्हटले होते की, ३७ नंबरचे मॅटर सुनावणीसाठी रिच होणे कठीण आहे. आता लोकांचा नवीन प्रश्न - जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटते शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचे राजकीय महत्त्व एकदम कमी होईल. शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील व मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल. उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील. सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयामुळे सुरु झालेला खेळ सर्वोच्च न्यायालयाच कधीतरी संपवेल, असे त्यांनी ट्विट करत म्हटले होते.

दरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वातील खंडपीठापुढे आज शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष व चिन्हाशी संबंधित वादावर सुनावणी होणार होती. हे प्रकरण कोर्टात ३७ व्या क्रमांकावर लिस्टेड होते. त्यावर सकाळच्या सत्रात ११.३० वाजता सुनावणी सुरू होऊन ती सलग २ दिवस चालणे अपेक्षित होते. पण आज अचानक कोर्टापुढे अरावली पर्वतरांगांचे प्रकरण आले. कोर्टाने या प्रकरणावर सुनावणी करण्यासाठी दुपारी १ ची वेळ निश्चित केली. परिणामी, गत ३ वर्षांपासून कोर्टात खितपत पडलेले सत्तासंघर्षाचे प्रकरण असेच पुढे ढकलण्यात आले आहे.

## e-KYC चुकली तरी घाबरू नका!:लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींची आता 'प्रत्यक्ष पडताळणी' होणार- अदिती तटकरे



**मुंबई :** राज्य सरकारकडून वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबांतील महिलांना लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जात असून, आता या योजनेच्या निकषांची अंमलबजावणी अधिक कडक करण्यात येत आहे. प्रशासनाकडून सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसी (e-KYC) पूर्ण करण्याचे वारंवार आवाहन करण्यात आले होते आणि त्यासाठी वेळोवेळी मुदतवाढही देण्यात आली होती. आता या संदर्भात महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी महत्त्वाची सूचना दिली आहे.

अदिती तटकरे यांनी ट्विट करत म्हटले की, महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी पर्यंत e-KYC करण्याची मुदत देण्यात आली होती.
तथापि, काही कारणास्तव e-KYC करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. म्हणूनच, योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी (Physical Verification) करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या असल्याची माहिती अदिती तटकरे यांनी दिली आहे.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेसंदर्भात सोशल मीडियावरून माहिती दिली असून, त्यांच्या या पोस्टवर लाभार्थी महिलांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिक्रिया येत आहेत. अनेक महिलांनी तांत्रिक अडचणींमुळे, विशेषतः ई-केवायसी करताना मोबाइलवर 'ओटीपी' न मिळाल्याने ही प्रक्रिया वेळेत पूर्ण होऊ शकली नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे तांत्रिक बिघाडामुळे प्रक्रियेपासून वंचित राहिलेल्या महिलांना दिलासा देण्यासाठी ई-केवायसीची मुदत आणखी काही दिवस वाढवून मिळावी, अशी आग्रही मागणी सोशल मीडियाच्या माध्यमातून केली जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ जानेवारी २०२६

## समाजसेवा ही व्यक्तिमत्व विकासाचा पाया - प्राचार्य डॉ. दिलीप गरुड



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारताला जगात महासत्ता बनवायचे असेल तर युवकांनी सामाजिक कार्यात पुढाकार घेतला पाहिजे. शिकणे, सेवा करणे आणि पुढे नेणे हीच तरुणांची त्रिसूत्री असून अशा शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, नेतृत्व गुण, सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. समाजसेवा ही व्यक्तिमत्व विकासाचा पाया असल्याचे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी केले. मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या वतीने भुसणी, ता. उमरगा येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या शाश्वत विकासासाठी युवक विशेष वार्षिक शिबिराप्रसंगी बुधवारी (ता. २१) रोजी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी माजी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राचार्य डॉ. सादक वली, उपसरपंच दशरथ मंडले, श्रीमंत पाटील, सुभाष बिराजदार, राजेंद्र व्हनाजे, महादेव संगशेट्टी, महादेव व्हनाजे, महादेव पाटील, गुलाब हिरमुखे, मुख्याध्यापक प्रेमनाथ आपचे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस डॉ. गरुड यांनी पुष्पहार घालून अभिवादन करून कुदळ मारून उद्घाटन करण्यात आले.डॉ. गरुड पुढे बोलताना म्हणाले की, आज युवकांमध्ये नैतिक मूल्यांचा ऱ्हास, वाढती स्पर्धात्मकता, बेरोजगारीमुळे तणावग्रस्त जीवन, वाढती व्यसनाधीनता, मोबाईलचा अतिरेकी वापर, अंधश्रद्धा या पार्श्वभूमीवर शिक्षणाकडे वस्तुनिष्ठ व सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. आज विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध असताना त्यांनी शिक्षणाबरोबरच मैत्रीपूर्ण जिव्हाळा निर्माण करावा. शिक्षणामुळे माणूस बौद्धिक दृष्ट्या सक्षम आणि प्रगल्भ बनतो, त्यामुळे जीवनमान सुधारते. संत गाडगेबाबा यांच्या कार्याची महती सांगताना भस्म, बुवा, जादूटोणा यांचा आता करूया त्याग. शिक्षण, विज्ञान आणि विवेक हाच समाजाचा बनवूया भाग असे ते शेवटी म्हणाले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिबिराच्या प्रत्येक उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन आपली स्वतंत्र ओळख निर्माण करावी. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शीला स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. कार्यक्रमास गावातील बहुसंख्य नागरिक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या. फोटो ओळ : भुसणी, ता. उमरगा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराप्रसंगी डॉ. दिलीप गरुड उद्घाटक म्हणून बोलताना अशोक सपाटे, दशरथ मंडले, सादक वली, चंद्रकांत बिराजदार व अन्य.

## महिला मेळावा व हळदीकुंकव कार्यक्रमात सरला कामे यांची बोलक्या बाहुल्यांतून प्रभावी जनजागृती




**गोळेगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोळेगाव येथे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आदरणीय श्री दिलीप स्वामी साहेब ,( भा. प्र. से.) यांचे संकल्पनेतून जिल्हा भरात सद्यस्थितीमध्ये दशसूत्री हा उपक्रम यशस्वीरित्या सुरू आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून आदरणीय जिल्हाधिकारी महोदय यांचे संकल्पनेतून आणि श्रीमती अश्विनी लाठकर शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे मार्गदर्शनात मुख्याध्यापक श्री नामदेव साखळे यांच्या आयोजनातून दशसूत्री कार्यक्रमांतर्गत महिला मेळावा व हळदीकुंकवाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात महिलांसाठी सामाजिक, आरोग्यविषयक व शैक्षणिक जनजागृतीवर विशेष भर देण्यात आला.या प्रसंगी श्रीमती मिनाताई वाघ होत्या तर प्रमुख पाहुने श्रीमती सरला कामे होत्या यांनी बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मुलींवर होणारे अत्याचार, गुड टच व बॅड टच याविषयी सुलभ व परिणामकारक पद्धतीने मार्गदर्शन केले. लहान मुलींनी कोणत्या स्पर्शाला योग्य व अयोग्य म्हणावे, स्वतःचे संरक्षण कसे करावे, तसेच अशा प्रसंगी कोणाकडे तक्रार करावी याबाबत त्यांनी महिलांना जागरूक केले.तसेच सिकलसेल ॲनिमिया या अनुवांशिक आजाराबाबतही त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. सिकलसेल आजाराची लक्षणे, तपासणीचे महत्त्व, वेळेवर उपचार व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत महिलांमध्ये जनजागृती करण्यात आली.कार्यक्रमात उपस्थित महिलांना श्रीमती सरला कामे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन करताना, महिलांनी स्वतः सजग राहून कुटुंबातील मुलींचे संरक्षण करावे, आरोग्यविषयक तपासणीकडे दुर्लक्ष करू नये व समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.श्री. पांजाबराव देशमुख ,अजीम दस्तगीर देशमुखश्रीमती. सारिका नागे, शारदा कुमाकर, सुरेखा थोरात, दिपाली, गलम , बुश्रा सुलताना, लुबना सय्यद, नुझत आलिया सिद्दीकी आदि शिक्षकवृंद व पालक महिला शाळा मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांचे सामुहीक खेळ घेण्यात आले महिलांनी या उपक्रमाचे कौतुक करत असे कार्यक्रम अधिक प्रमाणात आयोजित करण्याची मागणी केली. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक श्री नामदेव साखळे यांनी आभार प्रदर्शन केले व कार्यक्रमाचा समारोप केला

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्ध पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## संविधानवादी साहित्य सिद्धांत आणि दिशा - डॉ. अनंत राऊत यांच्या ग्रंथावर चर्चासत्र




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय व शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने "संविधानवादी साहित्य सिद्धांत आणि दिशा- डॉ. अनंत राऊत" यांच्या ग्रंथावर चर्चासत्र दि. 28 जानेवारी 2026 , बुधवारी सकाळी 11:00 वा . आयोजन करण्यात आले आहे. सदरील ग्रंथावर व संविधानवादी साहित्य सिद्धांत या विषयाच्या अनुषंगाने डॉ. दैवत सावंत, डॉ. युवराज धबडगे, डॉ. ह. नि. सोनकांबळे आणि डॉ. आनंद वाघ भाष्य, चर्चा करणार आहेत. सदर चर्चेत, चर्चासत्रात सहभागी होण्याचे अभ्यासक, संशोधकांना आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.व्ही. मस्के व शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवल थोरात यांनी केले आहे.

## जालन्यातील जेइएस महाविद्यालयात शाहीर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन.

**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** महाराष्ट्र शासनाच्या लोककला विभाग व जेईएस महाविद्यालय जालना येथे दहा दिवशीय लोककला प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून आज या शिबिराचे उद्घाटन देवगिरी महाविद्यालयाच्या संगीत विभाग प्रमुख प्रा. शैलजा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले, यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लोक शाहीर श्री.आप्पासाहेब उगले होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री हे होते. व्यासपीठावर प्रा. डॉ यशवंत सोनूने यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना उद्घाटक प्रा .शैलजा कुलकर्णी म्हणाल्या की लोककला या महाराष्ट्राचे वैभव असून त्या जपल्या पाहिजेत. यावेळी लोकशाहीर आप्पासाहेब उगले म्हणाले की लोककला या आम्ही जतन करत असून पुढच्या पिढी पर्यंत नेण्याचे कार्य करीत आहोत तरुण कलाकारांनी याचा आस्वाद न घेता यामधून लोकांचे प्रबोधन करावे.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉक्टर गणेश अग्निहोत्री म्हणाले की, महाराष्ट्राची वैभवशाली समृद्ध अशी लोकपरंपरा ही लोककरीतून दिसते. लोककला ह्या गौरवशाली इतिहासाचे दर्शन घडवतात.यावेळी प्रा डॉ.राजेंद्र सोनवणे, शाहीर कल्याण उगले ,शाहीर रामानंद उगले लोककलावंत माधवी माळी आनंद घुले ,शोहेब शेख विशाल उगले, प्रा. बाबुराव श्रीरामे, प्रा. बिन्नीवाले. प्रा. खंडागळे आदी उपस्थित होते. शिबिरार्थी तसेच महाविद्यालयातील शिक्षक शिक्षक तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ जानेवारी २०२६


# विद्यार्थ्यांनो खूप मेहनत करून जीवनात यशस्वी व्हा ! - ज्युनियर जॉनी लिव्हर रामेश्वर भालेराव



**कन्नड (प्रतिनिधी) :** चांगला कलावंत होणे ही अतिशय कठिण बाब आहे. त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. लहानपणापासून मला पक्षी, प्राणी, माणसे, कलावंत यांचे आवाज काढण्याची आवड होती. छोट्या मोठ्या कार्यक्रमात सादरीकरणाची संधी मिळाली. जॉनी लिव्हर यांचा माझ्यावर खूपच प्रभाव होता. त्यांचा अभिनय मी मिमिक्रीच्या माध्यमातून करू लागलो. ज्युनियर जॉनी लिव्हर हे नाव लोकांनी दिले. त्यांच्या सारखे होणे अवघड आहे. त्यासाठी मी खूप मेहनत घेतली. अभिनय शिकला, अभ्यास केला. त्यांचे चित्रपट पाहिले. आमरिश पुरी, जॉनी लिव्हर, अशोक सराफ हे माझे आदर्श आहेत. जॉनी लिव्हर यांना मी गुरु मानतो. विद्यार्थी दशे पासूनच मला मिमिक्री करण्याची आवड आहे. जॉनी लिव्हरचे चित्रपट पाहुन त्यांचा अभिनय करण्याची मला आवड निर्माण झाली. त्यामुळेच मी कलावंत होऊ शकलो असे प्रतिपादन ज्युनियर जॉनी लिव्हर लोक कलावंत रामेश्वर भालेराव यांनी केले. मी व्यसनापासून दुर राहिलो, आपणही व्यसनापासून दूर रहावे, खूप अभ्यास करून जीवनात यशस्वी व्हा ! असे आवाहन ही त्यांनी केले. (ता. २१ ) येथील शिवाजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे समारोप व पारितोषीक समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. मंचावर फार्मसी कॉलेजचे डॉ. राहुल क्षिरसागर, उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर, प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. उदय डोंगरे, डॉ. प्रकाश महाजन यांची उपस्थिती होती. प्रास्तविक डॉ. के. एल. भानुसे यांनी केले. सकाळच्या सत्रात शेलापागोटे सादर करण्यात आले. त्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. यावेळी लोककलावंत रामेश्वर भालेराव यांनी विविध राजकीय नेते, अभिनेते, कलावंत, पक्षी , प्राणी यांचे हुबेहुब आवाज काढून आपल्या अभिनयाने सर्वांना मनमुराद हसविले. आपल्या खास दमदार अभिनय व नक्कलाने सर्वांनाच खिळवून ठेवले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, कलेच्या क्षेत्रातही करियरच्या खूप संधी उपलब्ध आहे. हे आज आपणास लक्षात आले. मराठवाड्यातील एक दर्जेदार कलावंत आज आपल्यात उपस्थित आहे. कोणतेही क्षेत्र हे कमी नसते. आपल्या प्रयत्नाने व चिकाटीने काम केल्यास यश हमखास मिळते. विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव देण्याचे काम स्नेह संमेलनातून होत असते. विद्यार्थ्यांच्या सुप्त, कला, गुणांना वाव मिळावा म्हणून सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित केले जातात. या स्नेहसंमेलनातून प्रतिभावंत लोककलावंत घडतील , आपापल्या आवडीच्या क्षेत्रात आपण नावलौकिक मिळवावा, विद्यार्थ्यांनी अभ्यासा बरोबरच महाविद्यालयाच्या या उपक्रमाचा लाभ घेऊन जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन केले. या कार्यक्रमात वर्षभर विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या व स्नेह संमेलनात विविध कला प्रकारात पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय भालेराव यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मंगेश जाधव यांनी केले तर आभार प्रभारी प्राध्यापक डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते.

## ऊसदादा

ऊसदादा ऊसदादा
किती रे तू लंबू
अंगात सडपातळ
दिसतोस जणू बांबू

गोड गोड रस
अंगात तुझ्या किती
पोट दुखण्याची
वाटते आम्हा भीती

तुझ्यापासून बनते
साखर आणि गूळ
गोड खाण्याचे
सर्वांना लावतो खूळ

तुळशीच्या लग्नाला
तुझाच असतो मान
तुझ्या सजावटीने
मांडव सजतो छान

तुझ्या गोडपणाची
जिकडे तिकडे ख्याती
मधुमेही रूग्ण मात्र
दूर पळून जाती



- **रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# वैज्ञानिक संकल्पना मराठीत रुजणे आवश्यक - डॉ. डी. पी. चव्हाण




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** दि. २१ तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने घ्यावयाच्या उपक्रमाचा भाग म्हणून आज " वैज्ञानिक संकल्पना आणि मराठी भाषा " या विषयावर प्रा. डॉ.डी. पी. चव्हाण यांचे प्रदीर्घ व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावरून ते बोलत होते. वैज्ञानिक संकल्पना जनमानसात रुजविण्यात डॉ. जयंत नारळीकरांपासून ते निरंजन घाटे यांच्यापर्यंत अनेक वैज्ञानिकांनी व स्वायत्त संस्थांनी आपापल्या परीने कसा प्रयत्न केला याचा आढावा घेऊन ते पुढे म्हणाले की, वैज्ञानिक संकल्पना अधिकाधिक सप्रुक्तपणे मराठीत आणण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्यात अनेक अडथळे असले तरी ते दूर करता येतात. वैज्ञानिक संकल्पना त्या त्या भाषेत आविष्कृत करण्यासाठी जे निकष वैज्ञानिकांनी ठरवले होते ते फक्त लॅटिन भाषेतच होते आणि दुसरी भाषा म्हणजे संस्कृत भाषा होती, पण दुर्दैवाने त्यावेळी संस्कृत भाषेसाठी कुणीही पुढे आले नाही किंवा तसे प्रबोधन झाले नाही त्यामुळे तो विचार मागे पडला आणि सर्व नावे आणि माहिती लॅटिन भाषेत देण्यात आली. परंतु आज मराठी भाषेत इतर भाषेतील पारिभाषिक शब्द जशाच्या तसे स्वीकारून मराठी भाषेत समृद्धता व संपन्नता आणता येते.ती विविधतेने अलंकृत झाली आहे. कधी कधी आपल्याला मराठी भाषेतील शब्द अवघड वाटायला लागतात आणि इंग्रजी किंवा लॅटिन भाषेतील शब्द सोपे वाटायला लागतात ही मानसिकता आपणालाच बदलावी लागेल. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असून ती ज्ञानभाषा झाली आहे . तिला अधिक सक्षमपणे ज्ञानभाषा बनवायची असेल तर इतर भाषेतील अनेक शब्द आपल्याला स्वीकारावे लागतात. किंबहुना मराठी भाषेने तिच्या उत्क्रांत अवस्थेत अनेक इतर भाषेतील शब्द स्वीकारलेले आहेत. ही संपन्नता व समृद्धता आपल्याला आणखी वाढवायचे असेल तर ज्ञानभाषा म्हणून , वैज्ञानिक संकल्पना आपल्याला मराठी भाषेत अधिक प्रमाणामध्ये आणाव्या लागतील आणि माझ्या समजूतीप्रमाणे निश्चितच मराठी भाषेत वैज्ञानिक संकल्पना आपण आणू शकतो.असे अनेक प्रयत्न यापूर्वी झालेले आहेत. असे मत व्यक्त करून येणाऱ्या काळात शंभर टक्के मराठी भाषेत वैज्ञानिक संकल्पना आलेल्या असतील असे चित्र आपल्याला नजिकच्या काळात पाहायला मिळेल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनी अध्यक्षीय समारोप करताना कोणतीही भाषा कमी दर्जाची नसून प्रत्येक भाषेची लवचिकता तिला समृद्ध आणि विशाल बनविण्यासाठी सक्षम असते. फक्त तिच्याकडे पाहण्याची दृष्टी निकृष्ट दर्जाची असू नये. कारण भाषेवरून जात जाणून घेण्याची आपल्याकडील मानसिकता भाषेच्या विकासासाठी तारक नसल्याचे प्रतिपादन करून अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आसिया चिश्ती यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. नागसेन कांबळे यांनी केले. डॉ. विनोद धनेराव यांच्या आभारप्रदर्शनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ जानेवारी २०२६

## मुरूम येथे रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने महिलांसाठी भव्य हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने संभाजीनगर, काबरा प्लॉट येथे महिलांसाठी भव्य असा हळदी-कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास परिसरातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.या हळदी-कुंकू कार्यक्रमामध्ये महिलांना भेटवस्तू म्हणून "अभ्यास कसा करावा" हे पुस्तक देण्यात आले. ही भेट केवळ सांस्कृतिक परंपरेपुरती मर्यादित न ठेवता सामाजिक व शैक्षणिक दृष्टिकोनातून उपयुक्त ठरावी, हा यामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.यावेळी मार्गदर्शन करताना सौ. उमा सूर्यवंशी यांनी सांगितले की, मुलांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण करणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन देणे ही जबाबदारी प्रामुख्याने महिलांची आहे. घरातील वातावरण अभ्यासपूरक बनविण्यात महिलांचा वाटा महत्त्वाचा असून, मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मातांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. भेट म्हणून देण्यात आलेले "अभ्यास कसा करावा" हे पुस्तक मुलांना अभ्यासाची गोडी लावण्यास आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस निश्चितच उपयोगी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कविता राठोड , स्वामी मॅडम , मंगल दूधगे, प्रीती चौधरी, महादेवी बदोले, सुनीता निंबर्गे, गोकर्णा शेवाळकर, शेडेकर मॅडम, सुवर्णा खुळ, शारदा राठोड, राजश्री पवार यांनी परिश्रम घेतले.हा कार्यक्रम परंपरा, संस्कृती आणि शिक्षण यांचा सुंदर संगम ठरला असून रोटरी क्लब मुरूम सिटीच्या सामाजिक उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अय्युब पठाण यांना पुणेचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : साहित्य व सांस्कृतिक अकादमी, पुणे यांच्यावतीने सन २०२६ मध्ये दिला जाणारा अत्यंत सन्मानाचा व प्रतिष्ठेचा राष्ट्रीय व राज्यस्तरीय साहित्य अकादमी पुरस्कार यंदा मराठवाड्याचे प्रासिद्ध बाल साहित्यिक व कलावंत अय्युब पठाण लोहगावकर यांना जाहीर झाला आहे. असे पुणे येथील सहाय्यक प्रकल्प संचालिका श्रीमती प्रतिक्षा पाटील साहित्य व सांस्कृतिक अकादमी पुणे यांनी श्री. अय्युब पठाण यांच्यासाहित्यिक व सांस्कृतिक कार्याचे ई-मेलवर प्रस्ताव मागून पठाण यांची पुणे साहित्य अकादमीसाठी निवड करुन त्यांना नुकतेच मोबाईलद्वारे कळविण्यात आले आहे. साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर करतांना अय्युब पठाण यांचे गेल्या चाळीस वर्षातील मराठी साहित्यक्षेत्रातील भरीव योगदान मराठी लेखन व १५ प्रकाशित पुस्तके आणि बालभारतीच्या सहावीच्या अभ्यासक्रमात " पाणपोई " या कवितेचा समावेश हे लक्षात घेऊन तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील खास शालेय- महाविद्यालयीन मुलांमुलीसाठी " मुले रंगली काव्यात " या एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे २०० प्रयोगातून मनोरंजन करून जनजागृती व प्रबोधन केल्याने पुणे येथील साहित्य व सांस्कृतिक अकादमीने या कार्याची योग्य अशी दखल घेऊन अय्युब पठाण लोहगावकर यांना यंदा पुणे येथील साहित्य अकादमी पुरस्कारासाठी नामांकन यादीत श्री. पठाण यांची साहित्य व सांस्कृतिक कार्याची नोंद घेउनच हा पुरस्कार जाहीर केला आहे. साहित्य अकादमी पुरस्कार हा २७ फेब्रुवारी २०२६ मराठी राजभाषा दिनाच्या शुभ मुहूर्ताच्या रोजी पुणे येथे शानदार पुरस्कार सोहळ्यात अय्युब पठाण लोहगावकर यांना सन्मानपूर्वक मान्यवरांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप आकरा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, ताम्रपत्र, मानाची पुणेरी पगडी व सन्मानपत्र असे आहे.

# राजमाता जिजाऊ : स्वराज्याची जननी

इतिहास घडवणारे राजे अनेक असतात, पण राजे घडवणाऱ्या माता विरळाच. अशाच एका महान मातेचे नाव म्हणजे राजमाता जिजाऊ. त्या केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या, संपूर्ण स्वराज्याच्या माता होत्या. त्यांच्या विचारातून, संस्कारातून आणि धैर्यातूनच स्वराज्याचा पाया घातला गेला.राजमाता जिजाऊ यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी सिंदखेड येथे झाला. त्यांचे वडील सरदार लखुजी जाधव हे पराक्रमी, स्वाभिमानी आणि अन्यायाविरुद्ध उभे राहणारे योद्धे होते. त्यामुळे जिजाऊंवर लहानपणापासूनच शौर्य, नीती, स्वाभिमान आणि सत्यनिष्ठेचे संस्कार झाले. त्या काळातील स्त्रीजीवन मर्यादित असताना जिजाऊंनी मात्र आपल्या विचारांची आणि कर्तृत्वाची सीमा कधीही आखून घेतली नाही.शाहाजीराजे भोसले यांच्याशी विवाह झाल्यानंतर जिजाऊंच्या आयुष्यात संघर्षाचा आरंभ झाला. राजकीय अस्थिरता, सततची युद्धस्थिती, वैयक्तिक दुःख आणि अपमान सहन करतानाही जिजाऊ कधी खचल्या नाहीत. त्यांनी आपल्या जीवनातील वेदनांना शक्तीमध्ये रूपांतरित केले. पुण्याच्या जहागिरीची जबाबदारी स्वीकारताना त्यांनी केवळ प्रशासन सांभाळले नाही, तर स्वराज्याचा विचार जनमानसात रुजवण्याचं कार्य सुरू केलं.जिजाऊंच्या आयुष्यातील सर्वात महान कार्य म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे संगोपन आणि घडण. बाल शिवबाच्या मनावर त्यांनी रामायण, महाभारत, संतकथा, पराक्रमाच्या गोष्टी रुजवल्या. परकीय सत्तेच्या अन्यायाच्या कथा सांगत त्यांनी शिवबाच्या मनात स्वातंत्र्याची ज्वाला पेटवली. "आपण इथल्या मातीत जन्मलो आहोत, ही भूमी आपली आहे," ही भावना त्यांनी प्रत्येक श्वासात रुजवली.जिजाऊंनी शिवाजी महाराजांना केवळ युद्धकौशल्य शिकवलं नाही, तर राजधर्माची शिकवण दिली. प्रजेवर अन्याय नको, स्त्रीचा सन्मान राखावा, धर्माच्या नावावर भेदभाव करू नये आणि गरीब-दुर्बळांची बाजू घ्यावी हे सगळे मूल्य शिवाजी महाराजांच्या कारभारात स्पष्टपणे दिसतात, आणि त्यामागे जिजाऊंच्या संस्कारांची छाया आहे.स्वराज्याच्या स्थापनेत जिजाऊ प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या सहभागी होत्या. तोरणा, रायगड, राजगड हे केवळ किल्ले नव्हते, तर जिजाऊंच्या स्वप्नांची साकार रूपं होती. शिवाजी महाराजांचा प्रत्येक विजय हा जिजाऊंसाठी केवळ पुत्राचा विजय नव्हता, तर स्वराज्याच्या संकल्पनेचा विजय होता.जिजाऊंचं आयुष्य त्याग, संयम आणि धैर्याचं प्रतीक आहे. त्यांनी वैयक्तिक आयुष्यात अनेक दुःखं सहन केली पतीपासून दूर राहणं, राजकीय कटकारस्थानं, पुत्रांचे मृत्यू तरीही त्यांनी कधीही आपल्या विचारांपासून आणि कर्तव्यापासून पाऊल मागे घेतलं नाही. त्या काळात स्त्रीला दुर्बल समजलं जात असताना जिजाऊंनी सिद्ध केलं की स्त्री ही सर्जनशील आणि सामर्थ्यवान शक्ती आहे.जिजाऊंचं व्यक्तिमत्त्व अत्यंत शिस्तप्रिय होतं. त्यांनी स्वतः साधं आयुष्य जगलं आणि त्याच साधेपणाचं बाळकडू शिवाजी महाराजांना दिलं. ऐश्वर्य, सत्ता आणि वैभव असूनही जमिनीशी नातं तुटू न देणं, प्रजेशी आपुलकी ठेवणं ही शिकवण जिजाऊंच्या आचरणातूनच आली. त्यामुळेच शिवाजी महाराज हे "राजे" नव्हते, तर प्रजेचे राजे झाले.राजमाता जिजाऊ यांचा विचार केवळ मातृत्वापुरता मर्यादित नव्हता, तर राष्ट्रनिर्मितीचा विचार होता. त्यांनी शिवाजी महाराजांना दिलेले संस्कार हे एखाद्या किल्ल्याच्या मजबूत तटबंदीप्रमाणे होते बाह्य आक्रमणापासून मूल्यांचं रक्षण करणारे. त्यामुळेच शिवाजी महाराज सत्तेवर आल्यानंतरही अहंकार, क्रौर्य किंवा सूडभावना यांच्या आहारी गेले नाहीत. हा संयम, ही मर्यादा आणि हा विवेक जिजाऊंच्या शिकवणीचं फलित होतं.जिजाऊंनी आपल्या आयुष्यात स्त्री-सन्मानाचा एक उच्च आदर्श उभा केला. स्वराज्यात कुठल्याही स्त्रीवर अन्याय होऊ नये, तिचं शील आणि सन्मान अबाधित राहावा, हा आग्रह शिवाजी महाराजांनी जोपासला तो कुठून आला, तर जिजाऊंच्या संस्कारातून. त्या काळात स्त्रीकडे दुर्बल म्हणून पाहिलं जात असताना जिजाऊंनी सिद्ध केलं की स्त्री ही केवळ घर सांभाळणारी नाही, तर समाजाला दिशा देणारी शक्ती आहे.जिजाऊंचं जीवन आपल्याला सांगतं की संकटं ही आयुष्य थांबवण्यासाठी नसतात, तर माणूस घडवण्यासाठी येतात. त्यांनी आपल्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक दुःखाला शिक्षण मानलं आणि प्रत्येक संघर्षातून नवी दिशा शोधली. म्हणूनच त्यांचं जीवन म्हणजे सहनशीलतेचा नव्हे, तर सामर्थ्याचा इतिहास आहे.आजच्या काळात राजमाता जिजाऊ आपल्यासाठी एक प्रेरणास्थान आहेत. शिक्षण, संस्कार, राष्ट्रप्रेम आणि आत्मसन्मान या मूल्यांची आज अधिक गरज आहे. मुलांना केवळ यशस्वी नव्हे, तर सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक बनवायचं असेल, तर जिजाऊंच्या विचारांकडे वळणं अपरिहार्य आहे.राजमाता जिजाऊ म्हणजे केवळ इतिहासातील एक अध्याय नाहीत, तर आज आणि उद्याला दिशा देणारा दीपस्तंभ आहेत. प्रत्येक आईमध्ये जिजाऊ असावी, आणि प्रत्येक पिढीत शिवाजी घडावा हा संदेश त्यांच्या आयुष्याने दिला आहे.आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ त्यांची स्तुती करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांना आपल्या वागण्यात उतरवण्याचा संकल्प करूया. कारण जिजाऊंचं खरं स्मरण म्हणजे त्यांच्या विचारांचं आचरण होय. स्वराज्याच्या या महान जननीस विनम्र अभिवादन.



कु. रजनी कैलास गारघाटे

## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ जानेवारी २०२६

# नेताजी सुभाषचंद्र बोस : समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी मार्ग

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता.नेताजींच्या सामाजिक जाणीवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता ही नेताजींसाठी अत्यंत वेदनादायी बाब होती. जन्माच्या आधारे माणसामाणसांत भेद करणे हे अमानवी असून राष्ट्राच्या एकात्मतेसाठीही घातक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. जातिव्यवस्थेमुळे समाजाचा मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, सामाजिक सन्मान आणि मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. नेताजींनी या अन्यायाविरुद्ध केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतूनही संघर्ष केला. आजाद हिंद सेनेत जात, धर्म किंवा प्रांत यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वांना समान संधी देण्यात आली. सैनिकांना एकाच पंक्तीत उभे राहून भोजन करणे, समान शिस्त पाळणे आणि एकाच ध्येयासाठी लढणे, ही सामाजिक समतेची जिवंत उदाहरणे होती.स्त्री-सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले. आजाद हिंद सेनेतील 'राणी झाशी रेजिमेंट' ही भारतीय इतिहासातील स्त्री-मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते. नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये आर्थिक न्यायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था शोषणावर आधारित होती. शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्ग दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि असुरक्षिततेच्या गर्तेत अडकलेला होता. नेताजी समाजवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारताने अशी आर्थिक व्यवस्था स्वीकारली पाहिजे, जिथे संपत्ती काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित न राहता समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी वापरली जाईल. राज्याने लोककल्याणकारी भूमिका बजावून आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी त्यांची भूमिका होती.धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन 'जय हिंद'चा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होता.शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती. शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता.नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये शिस्त, कर्तव्यभावना आणि नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर जबाबदाऱ्यांची जाणीवही आहे. आजाद हिंद सेनेतील कठोर शिस्त ही केवळ लष्करी गरज नव्हती, तर भावी भारतीय समाजासाठीचा नैतिक आदर्श होती. भ्रष्टाचार, स्वार्थ आणि नैतिक अध:पतन यांचा त्यांनी तीव्र निषेध केला.युवाशक्तीवर नेताजींचा अपार विश्वास होता. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार असून सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी त्यांच्यावरच आहे, असे ते मानत. भीती, न्यूनगंड आणि निष्क्रियता यांचा त्यांनी तीव्र निषेध केला. ध्येयासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, त्यागाची वृत्ती आणि राष्ट्रासाठी बलिदान देण्याची क्षमता हीच युवकांची खरी ओळख असावी, असा त्यांचा संदेश होता.नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे सामाजिक कार्य आजच्या काळात अधिकच अर्थपूर्ण वाटते. वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, स्त्री-असमानता, सामाजिक तणाव आणि सांप्रदायिकता यांसारख्या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत नेताजींचा समतावादी, शिस्तप्रिय आणि राष्ट्रकेंद्री दृष्टिकोन आपल्याला मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या विचारांमध्ये केवळ संघर्षाची भाषा नाही, तर समाजबांधणीची स्पष्ट दिशा आहे.२३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करताना त्यांच्या केवळ शौर्याचे नव्हे, तर त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता, स्त्री-समानता, आर्थिक समतोल आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित भारत निर्माण करणे हेच नेताजींना खरे अभिवादन ठरेल. नेताजी हे इतिहासातील एक महान योद्धा नसून ते आजही भारतीय समाजाच्या आत्म्याला प्रेरणा देणारे जिवंत विचार आहेत.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

## दहावीच्या विद्यार्थ्यांचा परीक्षेचा फोबिया दूर; युनिक हायस्कूलमध्ये उर्दूला मिळाली 'गती'!



**जळगाव :** येथील युनिक हायस्कूलमध्ये एसएससी (दहावी) बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी नुकतेच एक विशेष 'उर्दू मार्गदर्शन सत्र' आयोजित करण्यात आले होते. या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेविषयी असलेला भीतीचा गंड दूर होऊन त्यांच्यात एक नवा उत्साह आणि आत्मविश्वास संचारला आहे.इकरा पब्लिक स्कूलच्या सुप्रसिद्ध मार्गदर्शिका झियाउनिसा मॅडम यांनी या सत्रात प्रमुख वक्ता म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत उर्दू विषयातील अवघड संकल्पना स्पष्ट केल्या. परीक्षेत उत्तरपत्रिका कशा प्रकारे लिहावी, वेळेचे नियोजन कसे करावे आणि कृतीपत्रिका (Activity Sheet) प्रभावीपणे कशी सोडवावी, यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला.मार्गदर्शनानंतर आपली प्रतिक्रिया देताना एक विद्यार्थी म्हणाला, "मॅडमची शिकवण्याची पद्धत अतिशय अप्रतिम आहे. त्यांनी कठीण वाटणारा उर्दू विषय खूपच सोपा करून सांगितला." तर दुसऱ्या एका विद्यार्थ्याने सांगितले की, "त्यांनी दिलेल्या महत्त्वाच्या 'टिप्स आणि ट्रिक्स'मुळे आम्हाला बोर्डाच्या परीक्षेत निश्चितच उत्तम गुण मिळवता येतील."विद्यार्थ्यांच्या या प्रगतीबद्दल शाळेचे व्यवस्थापन अत्यंत समाधानी आहे. शेख गुलाब आणि शेख नईम यांनी झियाउनिसा मॅडम यांचे आभार मानताना सांगितले की, "मॅडमच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा आमच्या विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला असून त्यांच्या परीक्षेच्या तयारीला यामुळे एक मोठी चालना मिळाली आहे." या उपक्रमाचे पालकांकडूनही कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ जानेवारी २०२६


## जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत नाईकनगर - सुंदरवाडी आश्रमशाळांचा डंका




**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : तालुक्यातील नाईक नगर सुंदरवाडी येथील श्री लाल बहादूर मागास समाजसेवा मंडळ, उमरगा संचलित विठ्ठल साई कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९ वर्ष वयोगटातील मुलांच्या संघाने, तसेच विठ्ठल साई माध्यमिक आश्रम शाळेच्या १७ वर्ष वयोगटातील मुले व मुलींच्या संघाने आणि व्हि. जे. प्राथमिक आश्रम शाळेच्या १४ वर्ष वयोगटातील मुले व मुलींच्या संघाने ता. जि. धाराशिव येथील शिंगोली आश्रम शाळेत आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय आश्रमशाळा खो-खो स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्यात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.ग्रामीण व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी कठोर सराव, शिस्त, संघभावना आणि जिद्दीच्या जोरावर हे दैदीप्यमान यश संपादन केले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. मानिकरावजी राठोड साहेब व सचिव मा. श्री. योगेशजी राठोड साहेब यांनी सर्व विजयी खेळाडूंचे मन:पूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या संघांना यशाच्या शिखरावर पोहोचवण्यासाठी वेदकुमार सगर सर, संतोष केंद्रे सर, अशोक राठोड सर व टोपासिंग राठोड सर यांनी दिलेले नियोजनबद्ध व शिस्तबद्ध मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले. त्यांच्या प्रशिक्षणामुळे खेळाडूंमध्ये आत्मविश्वास, तांत्रिक कौशल्य व संघभावनेचा उत्कृष्ट विकास साधला गेला.तसेच व्हि. जे. प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक गोविंद चव्हाण सर, विठ्ठल साई माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक, विठ्ठल साई कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रमेश जाधव सर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर यश मिळावे अशा शुभेच्छा दिल्या.या विजयामुळे श्री लाल बहादूर मागास समाजसेवा मंडळ, उमरगा संचलित संस्थांची शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातील भक्कम वाटचाल पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून नाईक नगर सुंदरवाडी व परिसरात आनंद व अभिमानाचे वातावरण पसरले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## जामडी फॉरेस्ट शिवारातील खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलीसांना यश





**कन्नड (अरुण थोरात)** : जामडी फॉरेस्ट ता.कन्नड शिवारात घडलेल्या खुनाच्या गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलीसांना यश मिळाले असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की,दि. 13 जानेवारी रोजी पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण हद्दीत जामडी फॉरेस्ट गावालगतच्या जंगलात एक अनोळखी प्रेत मिळुन आल्याची पोलीस ठाणे येथे माहिती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व पोलीस ठाणे चे अमलदार यांनी तात्काळ घटणास्थळी भेट देऊन मयत व्यक्तीचे प्रेताची पाहणी केली. याबाबत जामडी गावात विचारपुस करता मयताची ओळख पटविण्यात आली. ग्रामस्थांनी मयतास ओळखले, मयताचे नाव राजु रामचंद्र पवार रा. जामडी ता. कन्नड असे असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन मयताचा नातेवाईक प्रकाश रामचंद्र पवार रा. जामडी ता. कन्नड यांनी फिर्यादीवरून दिल्याने पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा गंभीर असल्याने मा. पोलीस अधिक्षक डॉ. वियनकुमार राठोड, व अपर पोलीस अधिक्षक अन्नपुर्णा सिंह यांनी तात्काळ घटणास्थळी भेट देऊन स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे स्टाफ यांना गुन्हा उघड करण्याच्या सुचना दिल्या. त्यावरुन पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपुत यांनी स्था.गु. शाखेचे 02 व पोस्टे कन्नड ग्रामीण यांचे एक पथक तयार करुन तपास सुरु करण्यात आला होता. सुरवातीस सर्व स्था.गु. शाखा पथक यांनी आजुबाजुस झाडा झुडपात, नाल्यात, शेतात, बारकाईने निरीक्षक केले. त्यावेळी मयताच्या अंगावरील अंडरपँट, फुटलेला मोबाईल, चप्पल या वस्तु मृतदेह मिळालेल्या ठिकाणापासुन काही अंतरावर वेगवेगळया ठिकाणी मिळत गेल्या त्यावरुन बारकाईन तपास करण्यात आला.नमूद तपासामध्ये गोपनीय व तांत्रिक माहितीवरून घटना घडते वेळी घटनास्थळाच्या शेजारील शेतामध्ये आजुबाजुस आजूबाजुचे ईसम शेतकरी, मजुर, यांना विचारपुस करण्यात आली परंतु काहीही माहिती मिळत नव्हती. जामडी गावातील व काहीही माहिती देत नव्हते. दिनांक 13 ते 20 जानेवारी रोजी दरम्यान सतत 08 दिवस तपास करण्यात आला. 50 पेक्षा जास्त संशयीत ईसम यांना पडताळण्यात आले परंतु सुगावा लागत नव्हता. याबाबत कोणीही माहिती देण्यास तयार नव्हते. पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपुत यांनी सदर मयत हा बंजारा समाजाचा असल्याने बंजारासमाजाची भाषा ज्ञात असणारे बाहेरगावातील ईसम व महिला यांना जामडी गावात माहिती काढण्याकरीता नेमले होते. थोडी थोडी माहिती मिळत गेल्याने व मयताचा मृतदेह मिळालेल्या ठिकाणा शेजारी शेतकरी यांची माहिती घेतली असता ते शेत हे राजु जोधा पवार यांचे असल्याची माहिती व तो शासकीय नोकरदार असून त्याची शेती ही त्याची पत्नी वंदना व लहान मुलगा धीरज उर्फ टेमा हे कसत असल्याची माहीती मिळाल्याने सदर महिला वंदना पवार हिस विचारपुस करता प्रथमता ती माहिती लपवत असल्याचा संशय आल्याने व नमूद महिला व तिचा मुलगा हे दि. 13 जानेवारी रोजी त्यांचे शेता मध्ये घटना घडतेवेळेस शेतात हजर असल्याबाबत माहिती मिळाल्याने, त्या अनुषंगाने नमूद महिला हिला विश्वासात घेऊन सखोल विचारपूस केली असता तिने कबुली दिली कि, मयत राजु पवार माझ्यासोबत शारीरिक संबंध ठेवण्याची मागणी करत होता. व ते मला मान्य नव्हते. त्याच्या या मागणीला मी कंटाळले होते. त्यामुळे मी माझ्या लहान मुलगा धीरज उर्फ टेमा राजू पवार यास सर्व हकीकत सांगून आम्ही दोघांनी मिळून त्यास ठार मारण्याचा कट रचला.दि. 13 जानेवारी रोजी सकाळी मी गावातून शेतामध्ये जात असताना राजू पवार यास इशारा करून शेताकडे येण्याबाबत सांगितले. त्यानुसार माझा मुलगा व माझ्यामध्ये कट ठरल्याप्रमाणे राजू पवार हा मला भेटण्याकरता माझ्या शेता जवळील झाडीमध्ये आला तो माझ्याशी शारीरीक सबंध करण्याकरीता त्याने कपडे काढुन शारीरीक संबंध ठेवणार होता. त्यावेळी मी माझ्या मुलाने त्याचे डोक्यात मारुन, मी त्याचे गुप्तांग दाबुन त्यास ठार मारले. पुरावा सापडु नये म्हणुन त्याचे प्रेत शेतापासून जवळ असलेल्या वनविभागाच्या गर्द झाडीत नेवून नाल्यात असलेल्या झाडाच्या मुळाखाली पाण्यात अटकवून लपवले. तसेच प्रेता पासून काही अंतरावर अंडरपँट व दिशाभूल करण्या करिता प्रेताचे विरूध्द दिशेला काही अंतरावर चप्पल व मोबाईल फोडून टाकले होते.तसेच नमूद मयत यास ठार मारण्याबाबतचा कट रचण्यात यातील आरोपी मुलगा धीरज उर्फ टेमा राजू पवार याने टीव्ही सिरीयल क्राइम पेट्रोल, सीआयडी तसेच दृश्यम पिक्चर याचे अवलोकन करून प्लॅनिंग व त्यानंतर प्रेताचे विल्हेवाट लावून पुरावा नाहीसा करणे, दिशाभूल करण्यासाठी चप्पल व मोबाइल घटनास्थळाच्या विरुद्ध दिशेला खूप अंतरावर नेऊन ठेवणे याबाबत दक्षता घेतली होती.स्था.गु.शा.पथकाने यातील मयतास ठार मारणारी महिला वंदना राजु पवार (वय 45 वर्ष) व तिचा मुलगा धिरज उर्फ टेमा राजु पवार (वय 18 वर्ष) दोन्ही रा. जामडी फॉरेस्ट ता. कन्नड यांनी सविस्तर घटनासागून गुन्हयाची कबूली दिली पुढील तपास पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण हे करत आहेत.सदर गुन्ह्याचा तपास हा सतत 08 दिवस स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपुत यांनी पथकासह कन्नड व जामडी गावात राहुन सुरवातीपासुन शेवटपर्यंत मिळालेल्या प्रत्येक माहितीची खात्री होईपर्यंत तपास अखंड चालुच ठेवला, तपासात सातत्य ठेवुन प्रत्येक संशयीत तपासला प्रसंगी बंजारा भाषा येणारे गोपणीय बातमीदार त्याच गावातील पाहुणे कोणालाही संशय न येता नेमुन माहिती काढली व अत्यंत कठीण व क्लिष्ट गुन्हा उघडकीस आणला.सदरची कामगीरी ही पोलीस अधिक्षक, डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधिक्षक अन्नपुर्णा सिंह, सहायक पोलीस अधिक्षक, अपराजिता अग्निहोत्री भा.पो.से. पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपुत, स.पो.नि. पवन इंगळे, स.पो.नि. सुधीर मोटे, पो.उपनि. महेश घुगे, पोह. विष्णु गायकवाड, रवि लोखंडे, प्रमोद पाटील, अशोक वाघ, शिवानंद बनगे, सुनिल गोरे, सचिन राठोड, दिपक सुरोसे, जनाबाई चव्हाण, पो. अमलदार महेश बिरुटे, अनिल काळे, बलविरसिंग बहुरे, योगेश तरमाळे, जीवन घोलप, गणेश घोरपडे, राजेश राठोड, संजय तांदळे, निलेश कुडे, शिवाजी मगर तसेच पो.स्टे. कन्नड ग्रामीणचे स.पो.नि. रामचंद्र पवार, पो.उपनि. अमोल जाधव, पोह. अजय मोतींगे, कैलास करवंदे, धिरज चव्हाण, लक्ष्मण गवळी, दिलवरसिंग वसावे, बाबासाहेब धनुरे, सविता सोनवणे, मोनिका सिरसाठ यांनी कामगिरी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ जानेवारी २०२६


## अंबाळा येथे २१ वा वर्धापन दिन व आदिवासी जनजागृती मेळावा उत्साहात संपन्न



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** सह्याद्री आदिवासी म.ठाकुर /ठाकर समाज उन्नती मंडळाचा २१ वा वर्धापन दिन व आदिवासी जनजागृती मेळावा हा छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील अंबाळा या ठिकाणी साजरा करण्यात आला आहे आदिवासी ठाकर समाज हा द-या खो-यात राहतो.हा समाज शिक्षणापासून खुप वंचित आहे.ठाकर समाजाने आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊन समाजाची प्रगती करावी असे अवाहन सहयाद्री आदिवासी म.ठाकुर /ठाकर समाज उन्नती मंडळाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष तथा राज्य दर्जा मंत्री व शहापुर आमदार माननीय श्री दौलतजी दरोडा साहेब यांनी केले तसेच समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीन असे आश्वासन दिले.अध्यक्षस्थानी सोमनाथ मेंगाळ यांची उपस्थिती होती व महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख तथा ठाणे जिल्हा अध्यक्ष मा श्री जानुजी हिरवे व तुळशीराम कातोरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आपली संस्था खेडोपाडी घराघरात पोहचली पाहीजे.सर्व ठाकर समाजाने संघटीत व्हावे युवकांनी समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी पुढे यावे संघटीत झालो तर आपल्या समस्या मागण्या सोडवू शकतो समाजासाठी चांगले कार्य करण्याचे अवाहन केले. इंजी सुधाकर मेंगाळ पांडू कडाळे मोखाडचे मा. सभापती एकनाथ झुगरे यांनी ही मनोगत व्यक्त केले. संघटनेच्या वतीने सत्कारमुर्ती जाणू हिरवा, डॉ भाऊराव उघडे,सुखदेव मेंगाळ, सिताबाई पथवे अरूण थोरात, भावराव आवाले, बुधा मधे, दामु मेंगाळ, विष्णू मेंगाळ, व आदिवासी राया ठाकर फाउंडेशन नांदगाव जि नाशिक या शाखेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष मधुकर गावंडे, मधुकर मेंगाळ आदी पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ठाकर समाजाचा सर्व प्रथम ग्रामविकास अधिकारी होणारी व्यक्ती नवनियुक्त प्रताप पथवे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जि प प्रा शाळा निरगुडी व अंबाला येथील मुलांनी नृत्य सादरीकरण केले. सुत्रसंचालन पांडू कडाळे यांनी केले. यावेळी कन्नड चे मा सभापती खेमा मधे,अंबाळा गावचे सरपंच सखाराम भुतांबरे,कळंकीचे पो पा काळु पथवे निरगुडी चे पो पा गंगाराम मेंगाळ,अल्काबाई मेंगाळ,गंगाराम अगिवाले,रतन मधे,दुबळीराम पथवे,शिवराम मेंगाळ लताबाई भुतांबरे बुधाबाई पोकळे,वंदना मेंगाळ,सरिचंद दोरे,तुकाराम मधे भावडू मेंगाळ,रघुनाथ कातवारे, बाळु मधे अंकुश कातवारे आदींसह हजारो आदिवासी समाज उपस्थित होते.

## जयभवानी महाविद्यालयात इस्त्राईल येथील शास्त्रज्ञ डॉ. सचिन घरत यांचे व्याख्यान



**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर यांच्या प्रेरणेने विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "करिअर इन बायोटेक्नॉलॉजी फिल्ड" या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यशाळेत इस्त्राईल येथिल शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत यांचे महाविद्यालयात सकाळी ठिक.१०:००वा. मार्गदर्शन लाभणार आहे.तरी पाटोदा तालुक्यातील विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा !असे संयोजन समितीच्या वत्तीने कळविण्यात आले आहे.या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर तर अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे उपस्थित राहाणार आहेत.तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा!असे संयोजन समितीच्या वत्तीने अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे व वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.बाळासाहेब जोशी यांनी कळविले आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903


## दौलताबाद सर्कलमध्ये काँग्रेसला धक्का; तालुका अध्यक्षांसह तीन उमेदवार भाजपमध्ये, निवडणूक लढत रंगतदार

**दौलताबाद (जावेद अहमद) :** जिल्हा परिषद सर्कलमध्ये काँग्रेस तालुका अध्यक्षांनी काँग्रेस चा हात सोडत हातात कमळ घेतल्याने दिग्गजांना जोरदार धक्का बसला आहे.दौलताबाद सर्कलमधील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, बुधवारी (दि. २१) उमेदवारी अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी मोठा राजकीय उलटफेर पाहायला मिळाला. काँग्रेसचे पंचायत समितीचे माजी उपसभापती व पश्चिम तालुका अध्यक्ष सर्जेराव चव्हाण यांनी अचानक काँग्रेस पक्षाला रामराम ठोकत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला असून, भाजपच्या वतीने त्यांनी दौलताबाद पंचायत समिती गणमधून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.या घटनेमुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला असून, काँग्रेससह आघाडीतील नेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, सर्जेराव चव्हाण हे काँग्रेसचे पश्चिम तालुका अध्यक्ष असल्याने त्यांच्या पक्षांतराकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.दौलताबाद सर्कलमधील जिल्हा परिषद दौलताबाद गट, पंचायत समिती दौलताबाद गण तसेच तिसगाव गण हे आतापर्यंत महाविकास आघाडीच्या प्रभावाखाली मानले जात होते. मात्र, या निवडणुकीत राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलताना दिसत आहेत. भाजपकडून रणनीतीपूर्वक हालचाली करण्यात आल्या असून, काँग्रेसचे माजी पंचायत समिती सदस्य यांनाही सोबत घेत भाजपने आपली ताकद वाढवली आहे.दरम्यान, भाजप साठी तिसगाव गणातून काँग्रेसचे कार्यकर्ते मनोज शिरसाट यांच्या पत्नी कविता सिरसाठ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तसेच तिसगाव येथील कोंगेस चे माजी पंचायत समिती सदस्य राणोबा जाधव यांच्या पत्नी लंकाबाई जाधव यांनीही जिल्हा परिषद गटातून उमेदवारी अर्ज भरल्याने काँग्रेसचा हात सोडून गटातील तिन्ही उमेदवारांनी कमळ हातात घेतल्याने तिसगाव गटातील लढत रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.या सर्व घडामोडींमुळे दौलताबाद जिल्हा परिषद सर्कलमध्ये भाजपला मोठे बळ मिळाले आहे.यासोबत शिवसेना उबाठा पक्षाकडून जिल्हापरिषद साठी सोनाबाई धम्मापाल गायकवाड तर दौलताबाद गणासाठी संतोष सुरासे, तिसगाव गणासाठी अबोली रामदास साळवे तर ए आय एम आय एम कडून जिल्हा परिषद साठी प्रतिभा कृष्णा साबळे,दौलताबाद गण दौलताबाद उपसरपंच सैय्यद मतीन,तिसगाव गण अनिता गोपाल उबाळेअत्यंत चुरशीची ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांकडून बोलले जात आहे. या निवडणुकीत काँग्रेस आणि महाविकास आघाडीला हा मोठा धक्का मानला जात असून, अर्ज मागे घेण्याच्या दिवशी खरी लढत लक्षात येईल पुढील काळात आणखी राजकीय हालचाली वेग घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |